# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः08.08.2026** **वारःशनिवार**

---

1. पंतप्रधानांच्या उपस्थितीत आज दिल्ली आयआयटीचा 57 वा दीक्षांत समारंभ
2. केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा आज मुंबई दौऱ्यावर; राष्ट्रीय सहकारी वित्त-विकास महामंडळाच्या नवीन कार्यालयाचं उद्घाटन करणार
3. ग्राहकांसाठी UPI सेवा मोफतच राहील; 'पेमेंट्स कौन्सिल ऑफ इंडिया'चा निर्वाळा आणि
4. महाराष्ट्रात शेतकरी कर्जमाफी योजनेचा 5 हजार कोटी रुपयांचा पहिला हप्ता पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये जमा.

**दीक्षांत समारंभ**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दिल्ली आयआयटी अर्थात भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या 57 व्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांना संबोधित करणार आहेत. या अग्रगण्य संस्थेनं संशोधन आणि नवोपक्रमाच्या क्षेत्रात नेहमीच महत्त्वपूर्ण योगदान दिलं असल्याचं समाज माध्यमावरील एका पोस्टमध्ये पंतप्रधानांनी नमूद केलं आहे. संस्थेतील विद्यार्थी आणि शिक्षकांशी संवाद साधण्यासाठी आपण उत्सुक असल्याचं त्यांनी सांगितलं. संस्थेच्या सोनीपत कॅम्पसमध्ये उभारण्यात आलेल्या 'परम प्रज्ञा' या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सुपरकम्प्युटिंग सुविधेचं उद्घाटन पंतप्रधान दूरस्थ पद्धतीनं करतील.

**आयुष्मान भारत**

आयुष्मान भारत डिजिटल मिशन' अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या 'स्कॅन अँड शेअर' सेवेनं 25 कोटी ओपीडी अर्थात बाह्यरुग्ण नोंदणीचा महत्त्वपूर्ण टप्पा ओलांडला आहे. ऑक्टोबर 2022 मध्ये 'स्कॅन अँड शेअर' सेवा सुरू झाली. याद्वारे क्यूआर-कोड स्कॅन करून रुग्णालयातील नोंदणी डिजिटल पद्धतीनं पूर्ण करण्याची सुविधा दिली जाते. 25 कोटींचा टप्पा हे भारताच्या डिजिटल आरोग्य परिसंस्थेवर नागरिक आणि आरोग्यसेवा पुरवठादारांनी ठेवलेला वाढता विश्वास दर्शवत असल्याचं राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुनील कुमार बरनवाल यांनी म्हटलं आहे.

**अमित शाह**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह आज मुंबईत राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त आणि विकास महामंडळाच्या नवीन कार्यालयाचं उद्घाटन करणार आहेत. यावेळी ते राज्यातील शहरी सहकारी बँक महासंघ तसंच जिल्हा संघटनांच्या प्रतिनिधींशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमादरम्यान राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त आणि विकास प्राधिकरण आणि राष्ट्रीय न्यायवैज्ञानिक विज्ञान विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार होणार आहे. त्यानंतर सहकारी बँकांची सायबर सुरक्षा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशानं उभारण्यात आलेल्या सुरक्षा संचालन केंद्राचं उद्घाटनही शहा यांच्या हस्ते होणार आहे.

**नितीन गडकरी**

आधुनिक वाहनं आता केवळ यांत्रिक साधनं राहिलेली नसून ती सॉफ्टवेअरवर आधारित कनेक्टेड डिजिटल प्रणाली बनली आहेत. अशा आधुनिक वाहनांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी केंद्रीय रस्ता वाहतूक संस्था, ऑटोसिफू प्रायव्हेट लिमिटेड आणि जगमंगल सोशल फाउंडेशन यांनी संयुक्तपणे काल पुण्यात एका उपक्रमाचं आयोजन केलं होतं. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते दूरस्थ प्रणाली द्वारे याचं उद्घाटन करण्यात आलं. सायबर सुरक्षित वाहनांसाठी एकत्रित प्रयत्न आवश्यक असल्याचं गडकरी यावेळी म्हणाले. ऑटोमोटिव्ह सायबर सिक्युरिटीचा संबंध केवळ वाहन सुरक्षेशी नसून रस्ते

सुरक्षा, सार्वजनिक सुरक्षा, राष्ट्रीय सुरक्षा आणि ग्राहकांचा विश्वास यांच्याशी जोडलेला आहे, असं गडकरी यांनी यावेळी नमूद केलं.

**राष्ट्रपती-हातमागदिन**

राष्ट्रीय हातमाग दिन काल देशभरात साजरा करण्यात आला. यानिमित्त राष्ट्रपती भवनात काल आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 2025 वर्षासाठीचे 'संत कबीर हातमाग पुरस्कार' आणि 'राष्ट्रीय हातमाग पुरस्कार' अशा एकंदर 22 पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं. हातमाग विणकरांच्या कौशल्यपूर्ण कारागिरीसाठी, नाविन्यपूर्ण कार्यासाठी आणि भारताच्या हातमाग परंपरांच्या जतनासाठी हे पुरस्कार देण्यात येतात. देशात समृद्ध आणि वैविध्यपूर्ण हातमाग विणकाम परंपरांचं स्मरण करून देणाऱ्या चार विशेष टपाल तिकीटांचंही याप्रसंगी अनावरण करण्यात आलं. हजारो वर्षांपासून हातमाग हा भारताच्या सांस्कृतिक प्रवासाचा अविभाज्य भाग राहिला आहे, या क्षेत्राने भारताचा समृद्ध वारसा जपण्यासोबतच रोजगार, महिला सक्षमीकरण, कला, संस्कृती आणि निसर्गाप्रती प्रेम यांनाही चालना दिली असल्याचं राष्ट्रपती यावेळी बोलताना म्हणाल्या.

**UPI सेवा**

ग्राहकांसाठी UPI सेवा मोफतच राहील असा निर्वाळा  PCIअर्थात 'पेमेंट्स कौन्सिल ऑफ इंडिया'नं दिला आहे. प्रत्येक भारतीय नागरिक कोणत्याही व्यवहार शुल्काशिवाय इन्स्टंट डिजिटल पेमेंट व्यवहार सुरू ठेवू शकतो, तसंच, डिजिटल पेमेंट स्वीकारणाऱ्या लहान व्यापाऱ्यांवरही कोणतंही शुल्क आकारलं जाणार नसल्याचं PCIनं एका निवेदनात  स्पष्ट केलं आहे. UPI ची विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी तंत्रज्ञान, सायबर-सुरक्षा, फसवणूक रोखणं आणि नवनवीन उपाययोजना यांमध्ये बँका, फिन-टेक कंपन्या, NPCI आणि रिझर्व बँक गुंतवणूक करत असल्याचं PCI नं सांगितलं.व्यवहारांचं  प्रमाण वाढत असताना, आगामी काळातही ग्राहकांना आणि व्यवसायांना,UPI द्वारे विश्वसनीय सेवा मिळणं सुनिश्चित करण्यासाठी ही गुंतवणूक सुरू ठेवणं आवश्यक असल्याचं PCI नं नमूद केलं.

**संसद-कामकाज**

संसदेच्या दोन्ही संभागृहांमध्ये विविध मुद्द्यावरून कालही विरोधकांनी गदारोळ केला; त्यामुळे कामकाज सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आलं. तत्पूर्वी लोकसभेत काल 'सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास सुधारणा विधेयक, मंजूर करण्यात आलं.

राज्यसभेत हे विधेयक यापूर्वीच मंजूर झालं आहे. देयकांमधील विलंब दूर करणं आणि वाद निवारण प्रक्रिया सुलभ करणं हे या विधेयकाचं उद्दिष्ट आहे.

**FCRA-रणधीर जयस्वाल**

परदेशातून येणाऱ्या निधीच्या नियमनामध्येसुधारणा करणाऱ्या प्रस्तावित विधेयकाबाबत अमेरिकेच्या एका लोकप्रतिनिधीनं उपस्थित केलेले आक्षेप भारतानं फेटाळून लावले आहेत. कायदेविषयक बाबी ही देशाची अंतर्गत बाब असून त्याबाबतचे निर्णय संसद घेत असल्याचं भारतानं स्पष्ट केलं आहे. नवी दिल्ली इथं प्रसारमाध्यमांशी बोलताना परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी यासंदर्भातील एका प्रश्नाला उत्तर देताना ही भूमिका मांडली. अमेरिका आणि इतर अनेक देशांमध्ये परदेशी निधीचं नियमन केलं जात असल्याचं जयस्वाल यांनी निदर्शनास आणून दिलं.

**उर्जामंत्री**

भारत आणि श्रीलंके दरम्यान काल नवी दिल्ली इथं उर्जा क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्याबाबत बैठक झाली. या बैठकीला केंद्रीय ऊर्जा तसंच गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल आणि श्रीलंकेचे बंदरं आणि नागरी विमान वाहतूक मंत्री तसंच ऊर्जा मंत्री अनुरा करुणाथिलके उपस्थित होते. यावेळी प्रस्तावित भारत-श्रीलंका एचव्हीडीसी वीज जोडणी आणि संपूर सौर ऊर्जा प्रकल्पासह सध्या सुरू असलेल्या द्विपक्षीय उपक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला

**कर्जमुक्ती योजना**

महाराष्ट्रात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या लाभ वितरणाला कालपासून प्रारंभ करण्यात आला. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात 6 लाख 22 हजार पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांमध्ये 5 हजार 28 कोटींचा पहिला हप्ता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने हस्तांतरित करण्यात आला. पहिल्या टप्प्यात कर्जमाफीची रक्कम जमा केली जाणार असून, दुसऱ्या टप्प्यात प्रोत्साहनपर रक्कम जमा केली जाणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, यांच्यासह विविध खात्यांचे मंत्री आणि पदाधिकारी उपस्थित होते.

**मुंबई-विकास-मुख्यमंत्री**

मुंबई महानगर प्रदेशाच्या नियोजित, शाश्वत आणि जागतिक दर्जाच्या विकासासाठी राज्य शासनानं आंतरराष्ट्रीय संस्थांशी केलेल्या भागीदारीमुळं 'तिसऱ्या मुंबई'च्या विकासाला मोठी गती मिळणार असल्याचा विश्वास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल व्यक्त केला. एमएमआरडीए, रायगड–पेण ग्रोथ सेंटर लिमिटेड, आणि सिंगापूरच्या टेमासेक समूहातील सुरबाना ज्युराँग आणि मॅपलट्री यांच्यात काल सामंजस्य करार झाला; त्यानंतर ते बोलत होते.

**आंदोलन**

झारखंड मध्ये JPSC आणि JSSC परीक्षांमधल्या कथित अनियमिततेवरून सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, झारखंड सरकार आणि विद्यार्थी शिष्टमंडळ यांच्यात काल पहिली अधिकृत चर्चा झाली. दरम्यान, या प्रकरणाचा तपास आणि त्याभोवतीच्या राजकीय हालचालींनीही वेग घेतला आहे. सुमारे दीड तास चाललेल्या या बैठकीत, भरती परीक्षांमध्ये पारदर्शकता असावी, कथित अनियमिततेची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि भरती प्रक्रियेत व्यापक सुधारणा केल्या जाव्यात, या मागण्यांचा विद्यार्थ्यांनी पुनरुच्चार केला. विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सरकार सकारात्मक पावले उचलेल असं मंत्र्यांनी यावेळी सांगितलं. दरम्यान, सरकार विद्यार्थ्यांच्या समस्यांबाबत संवेदनशील असून चर्चेद्वारे हा प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचं मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी म्हटलं आहे.

**बॅडमिंटन**

दक्षिण कोरिया मध्ये आसां इथं सुरू असलेल्या कोरिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या रक्षित रामराज आणि अश्मिता चालिहा यांनी महिला एकेरीची उपांत्य फेरी गाठली आहे. उपांत्यपूर्व फेरीत उद्या अश्मिता आणि रक्षित आमनेसामने असतील.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं आज ओडिशा आणि राजस्थानमध्ये अति मुसळधार पाऊस, तसंच वादळ आणि विजांच्या कडकडाटाचा इशारा दिला आहे.ईशान्य भारत, छत्तीसगड, मध्य प्रदेश, झारखंड, कर्नाटक, उत्तराखंड, पश्चिम बंगाल, केरळ आणि माहे या भागांतही आज मुसळधार पाऊस आणि वादळासह विजांच्या कडकडाटाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**